श्रीमती मंगल साहेबराव नरवडे, प्रा.शि.
जि.प.प्रा.शा.नवलेवाडी,ता.पारनेर
यांनी केलेल्या गैरवर्तनामुळे
पदावरुन तात्पुरते दुर करणेबाबत

अहमदनगर जिल्हा परिषद
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जिल्हा परिषद आदेश क्रमांक कार्या2/खाचौद/1308/2018
अहमदनगर, दिनांक - 19/12/2018

संदर्भ - 1) गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती पारनेर यांचेकडील अहवाल क्रमांक आस्था2/930/2018, दिनांक 17/12/2018
2) महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 मधील नियम क्रमांक 3

संदर्भ क्रमांक 1 अन्वये गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती पारनेर यांचेकडील अहवालानुसार श्रीम. मंगल साहेबराव नरवडे, प्राथमिक शिक्षिका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवलेवाडी, ता.पारनेर, जिल्हा - अहमदनगर येथे कार्यरत असतांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नवलेवाडी, ता.पारनेर येथील विद्यार्थिनींशी झालेल्या गैरवर्तनाबाबत आपण वेळीच कार्यवाही न केल्यामुळे व विद्यार्थीनीच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष व हलगर्जीपणा केलेला आहे. जिल्हा परिषद कर्मचा-याने नेहमी सचोटीने वागणे,कर्तव्य परायण असणे आवश्यक आहे. तथापी कर्तव्याचे पालन न केलेने आपण महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम 1967 चे नियम 3 चा भंग केलेला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 च्या नियम 3 मध्ये दिलेल्या तरतुदीस अधिन राहून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन या आदेशा द्वारे श्रीम. मंगल साहेबराव नरवडे, प्राथमिक शिक्षिका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवलेवाडी, ता.पारनेर,,जिल्हा -अहमदनगर यांना आदेशाच्या दिनांका पासून पदावरुन तात्पुरते दुर करणेत येत आहे.

याद्वारे असाही आदेश देण्यांत येत आहे की, हा आदेश अंमलात राहील तेवढ्या कालावधीत श्रीम. मंगल साहेबराव नरवडे, प्राथमिक शिक्षिका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवलेवाडी, ता.पारनेर,,जिल्हा -अहमदनगर यांचे मुख्यालय पंचायत समिती श्रीगोंदा येथे राहील.

श्रीम. मंगल साहेबराव नरवडे, प्राथमिक शिक्षिका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवलेवाडी, ता.पारनेर,जिल्हा - अहमदनगर यांना गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा यांच्या पुर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

श्रीम. मंगल साहेबराव नरवडे, प्राथमिक शिक्षिका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवलेवाडी, ता.पारनेर, जिल्हा -अहमदनगर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी,स्वीयेत्तर सेवा आणि निंलंबन,बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम 1981 मधील नियम 68 च्या तरतुदी नुसार निलंबन भत्ता व पुरक भत्ते देण्यात यावेत. पदावरुन तात्पुरते दुर केलेचे कालावधीत श्रीम.मंगल साहेबराव नरवडे, प्राथमिक शिक्षिका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवलेवाडी, ता.पारनेर,,जिल्हा -अहमदनगर यांनी खाजगी नोकरी स्वीकारु नये, आपण तसे केल्यांस त्याप्रमाणे दोषारोप आपणांर ठेवण्यांत येतील. तसेच आपण निलंबन निर्वाह भत्ता गमाविण्यांस पात्र असाल. निलंबनाच्या कालावधीत निलंबन निर्वाह भत्ता जेंव्हा जेंव्हा देण्यांत येईल त्या वेळी आपण खाजगी नोकरी

स्विकारली नाही अथवा कोणताही खाजगी धंदा वा व्यवसाय करीत नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र श्रीम.मंगल साहेबराव नरवडे, प्राथमिक शिक्षिका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवलेवाडी, ता.पारनेर, जिल्हा -अहमदनगर यांना सादर करावे लागेल. निलंबनाच्या कालावधीत श्रीम.मंगल साहेबराव नरवडे, प्राथमिक शिक्षिका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवलेवाडी, ता.पारनेर,जिल्हा -अहमदनगर यांना पदावरुन तात्पुरते दुर केलेचे कालावधीत निर्वाह भत्ता देण्याबाबतची कार्यवाही गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, पारनेर जिल्हा - अहमदनगर हे करतील.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संकेतांक क्रमांक 201812191160412 असा आहे.

(विश्वजीत माने)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

श्रीमती मंगल साहेबराव नरवडे,प्राथमिक शिक्षिका
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवलेवाडी, तापारनेर.,
द्वारा - गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती पारनेर

प्रत -

1) गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती पारनेर, जिल्हा - अहमदनगर

2/- सदर आदेश श्रीम. मंगल साहेबराव नरवडे, प्राथमिक शिक्षिका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवलेवाडी, ता.पारनेर,,जिल्हा -अहमदनगर यांना समक्ष बजाविणेत येऊन दुय्यम प्रतीवर दिनांकित स्वाक्षरीसह प्रत व 1 ते 4 दोषारोप ज्ञापन अहवाल 5 दिवसांत या कार्यालयांस सादर करणेची दक्षता घेणेत यावी.

2) गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा, जिल्हा - अहमदनगर

3/-सेवा निलंबन आदेशात नमुद आदेशाप्रमाणे कार्यवाही करणेची दक्षता घेणेत यावी.

(विश्वजीत माने)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर